# व्यवस्थापन परिषद सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा दि.२६ जुलै २००८ रोजी सकाळी ११-४५ वा. व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहामध्ये झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सौ. व्ही. जे. नाईकनवरे | सदस्या |
| ३) | ॲड. श्री. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | डॉ. पी. बी. जोशी, प्र.संचालक म. व वि. वि. मं. तथा प्र. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य तथा स्थायी निमंत्रित |
| ६) | प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ७) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| ११) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्या |
| १२) | डॉ. एम. एस. शेजूळ - कुलसचिव तथा प्र.परीक्षा नियंत्रक | सदस्य सचिव तथा स्थायी निमंत्रित |

मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील, श्री. पी. एम. हिरेमठ आणि डॉ. बी. बी. कदम सहसंचालक उच्च शिक्षण सहसंचालनालय कोल्हापूर विभाग यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले त्यानुसार त्याची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.

सभेच्या सुरुवातीस सदस्य सचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सर्व मान्यवर सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली.

डॉ. एम. एस. शेजूळ यांची कुलसचिव पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा विषय सूचक डॉ. पी. जी. मोरे यांनी मांडला यास डॉ. एल. पी. देशमुख यांनी अनुमोदन केले. डॉ. एम. एस. शेजूळ यांनी कुलसचिव पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांना भविष्यात सर्वतोपरी मदत करण्याचे व्यवस्थापन परिषद सदस्यांनी सर्वानुमते आश्वासन दिले.

**विषय क्र. १: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४, कलम ७६(२)(इ) अन्वये विद्यापीठातील विविध संकुलातील शिक्षक पदाच्या निवड समितीवर विद्या परिषदेने शिफारस केलेल्या तज्ञांच्या यादीमधून तीन तज्ञांच्या नावाचे नामांकन करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस स्नेहादराने अग्रेषित..**

विद्यापीठाने विविध संकुलातील शिक्षक पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये प्रत्येक पदासाठी विषय विशेषत: दर्शविलेली आहे. त्या अनुषंगाने शिक्षक पदे भरण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७६(२)(इ) अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या तज्ञांच्या पॅनलमधून प्रत्येक संकुलासाठी संबंधित विषय विशेषत: च्या अनुषंगाने तीन विषय तज्ञांचे नामांकन व्यवस्थापन परिषदेने करावयाचे आहे. सोबत जाहिरातीची प्रत विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या तज्ञांचे पॅनल जोडण्यात येत आहे.

सबब, विषय तज्ञांचे नामांकन करण्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस सादर.

**ठराव क्र. १: विद्यापरिषदेच्या वतीने सादर केलेल्या विषयतज्ञांच्या नावांना मान्यता देण्यात आली तसेच मुलाखती व्यवस्थित पार पाडण्याच्या दृष्टीने व उपलब्धतेनुसार या नावाव्यतिरिक्त काही विषयतज्ञांची नावे घेण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्यात आले.**

[कृ.मा.प.]

**विषय क्र. २: विद्यापीठामधील विविध विषयासाठी शिक्षकाच्या तात्पुरत्या स्वरुपावर एकत्रित वेतनावर नियुक्तीबाबत.**

(टिपणी:- विद्यापीठामधील विविध विषयासाठी शिक्षकांच्या तात्पुरत्या स्वरुपावर एकत्रित वेतनावर / सी.एच.बी. वर भरावयाच्या शिक्षक भरतीची जाहिरात दि. १५ मे २००८ रोजी दैनिक लोकमत, दैनिक पुढारी व दि. ०९ जुलै २००८ रोजी दैनिक पुढारी मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७७ नुसार सदर पदांच्या भरतीची थेट मुलाखत दि. १५ जुलै २००८ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर मुलाखतीमध्ये खालील प्रमाणे विषयावर शिक्षकांची निवड करण्यात येऊन संबंधित शिक्षकांना नियुक्तीचे आदेश या शैक्षणिक वर्षापर्यंत अथवा नियमित शिक्षकांची भरती होईपर्यंत अथवा जो कालावधी आधीचा असेल तोपर्यंत देण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | शैक्षणिक पात्रता | दरमहा वेतन रु. |
|---|---|---|---|
| | **संख्याशास्त्र** | | |
| १) | कु. अपर्णा कुलकर्णी | एम.एस्सी. पी.एच.डी. | ५,०००/- |
| | **संगणकशास्त्र** | | |
| १) | श्री. चव्हाण आनंद मा. | एम.सी.ए. | १०,०००/- |
| | **गणित** | | |
| १) | श्री. मठ सी. एन. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |
| २) | श्री. जेटीथोर ए. ए. | एम.एस्सी., बी.एड. | ५,०००/- |
| ३) | श्री. गायकवाड व्ही. एम. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |
| | **रसायनशास्त्र** | | |
| १) | श्री. म्हमाणे डी. एस. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |
| २) | श्री. चव्हाण एच. व्ही. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |
| ३) | कु.काझी एस.एस. | एम.एस्सी. | C.H.B. |
| ४) | श्री. शेख एम. एम. | एम.एस्सी. | ५,०००/- |
| ५) | कु. ईडे आर. एस. | एम.एस्सी. | C.H.B. |
| | **शिक्षणशास्त्र** | | |
| १) | कु. दातार योगीता गजानन | एम.एस्सी., बी.एड. नेट | ८,०००/- |
| २) | श्री. मुंडेगांवकर गणेश अनंतराव | एम.एड., नेट | १०,०००/- |
| ३) | श्री. जमादार जी.टी. | एम.एड., सेट | १०,०००/- |

वरीलप्रमाणे मा. कुलगुरुंनी केलेल्या कार्यवाहीचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. २: विद्यापीठामधील विविध विषयासाठी शिक्षकाच्या तात्पुरत्या स्वरुपावर एकत्रित वेतनावर नियुक्तीबाबत मा.कुलगुरुंनी केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. ३: विद्यापीठातील कंत्राटी अधिव्याख्यात्यांना देण्यात येणाऱ्या एकत्रित वेतनात वाढ करण्याबाबत प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस सादर..**

(टिपणी: विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, कलम ७७ अन्वये खाली दर्शविल्याप्रमाणे एकत्रित वेतनावर काही अधिव्याख्यात्यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेली आहे. त्यांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.)

| अ.क्र. | उमेदवारांचे नांव | शैक्षणिक पात्रता | दरमहा वेतन रु. |
|---|---|---|---|
| | **संख्याशास्त्र** | | |
| १) | कु. अपर्णा कुलकर्णी | एम.एस्सी. पी.एच.डी. | ५,०००/- |
| | **संगणकशास्त्र** | | |
| १) | श्री. चव्हाण आनंद मा. | एम.सी.ए. | १०,०००/- |
| | **गणित** | | |
| १) | श्री. मठ सी. एन. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |
| २) | श्री. जेटीथोर ए. ए. | एम.एस्सी., बी.एड. | ५,०००/- |
| ३) | श्री. गायकवाड व्ही. एम. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | **रसायनशास्त्र** | | |
| १) | श्री. म्हमाणे डी. एस. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |
| २) | श्री. चव्हाण एच. व्ही. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- |
| ३) | कु.काझी एस.एस. | एम.एस्सी. | C.H.B. |
| ४) | श्री. शेख एम. एम. | एम.एस्सी. | ५,०००/- |
| ५) | कु. ईडे आर. एस. | एम.एस्सी. | C.H.B. |
| | **शिक्षणशास्त्र** | | |
| १) | कु. दातार योगीता गजानन | एम.एस्सी., बी.एड. नेट | ८,०००/- |
| २) | श्री. मुंडेगांवकर गणेश अनंतराव | एम.एड., नेट | १०,०००/- |
| ३) | श्री. जमादार जी.टी. | एम.एड., सेट | १०,०००/- |

याबाबत पुढे असे सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्रमांक : एससीपी-२००७/(१७०/०७)मशि-२, दि.१०-०६-२००८ अन्वये शासकीय महाविद्यालय / संस्था / अध्यापक महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अर्हता धारक कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या सध्या देण्यात येणाऱ्या एकत्रित वेतन रु.८,०००/- यात सुधारणा करुन ते रु.१२,०००/- इतके ठोक मासिक वेतन शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून लागू करण्यास शासनाची मंजूरी कळविलेली आहे.

याबाबत असे निदर्शनास आणण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णय फक्त **शासकीय महाविद्यालय / संस्था / अध्यापक महाविद्यालय** यांनाच लागू होतो.

सबब शासनाने त्यांच्या अधिव्याख्यात्यांच्या एकत्रित वेतनात रु.८,०००/- ऐवजी रु.१२,०००/- केल्याच्या धरतीवर या विद्यापीठातील कंत्राटी अधिव्याख्यात्यांच्या एकत्रित वेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेस विचारार्थ सादर.

**ठराव क्र. २:** **संगणकशास्त्र विभागासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास नवीन ३ शिक्षक पदे रु.१२,०००/- एकत्रित वेतनावर घेण्याबाबत सर्वाधिकार मा.कुलगुरुंना देण्यात आले. तसेच खालीलप्रमाणे वेतनवाढीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | शैक्षणिक पात्रता | सध्या दिले जाणारे वेतन | व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेले वेतन |
|---|---|---|---|---|
| | **संख्याशास्त्र** | | | |
| १) | कु. अपर्णा कुलकर्णी | एम.एस्सी. पी.एच.डी. | ५,०००/- | **१२,०००/-** |
| | **संगणकशास्त्र** | | | |
| १) | श्री. चव्हाण आनंद मा. | एम.सी.ए. | १०,०००/- | **१२,०००/-** |
| | **गणित** | | | |
| १) | श्री. मठ सी. एन. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- | **१२,०००/-** |
| २) | श्री. जेटीथोर ए. ए. | एम.एस्सी., बी.एड. | ५,०००/- | **१२,०००/-** |
| ३) | श्री. गायकवाड व्ही. एम. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- | **१२,०००/-** |
| | **रसायनशास्त्र** | | | |
| १) | श्री. म्हमाणे डी. एस. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- | **१२,०००/-** |
| २) | श्री. चव्हाण एच. व्ही. | एम.एस्सी., सेट | ८,०००/- | **१२,०००/-** |
| ३) | कु.काझी एस.एस. | एम.एस्सी. | C.H.B. | **---** |
| ४) | श्री. शेख एम. एम. | एम.एस्सी. | ५,०००/- | **१२,०००/-** |
| ५) | कु. ईडे आर. एस. | एम.एस्सी. | C.H.B. | **---** |
| | **शिक्षणशास्त्र** | | | |
| १) | कु. दातार योगीता गजानन | एम.एस्सी., बी.एड. नेट | ८,०००/- | **१२,०००/-** |
| २) | श्री. मुंडेगांवकर गणेश अनंतराव | एम.एड., नेट | १०,०००/- | **१२,०००/-** |
| ३) | श्री. जमादार जी.टी. | एम.एड., सेट | १०,०००/- | **१२,०००/-** |

**विषय क्र. ४: मा. आ. श्री. प्रकश शेंडगे, विधान परिषद सदस्य यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना - सोलापूर येथील विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत.**

(टिपणी:- याबाबत असे सादर करण्यात येते की, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे दि.२३/०७/२००८ च्या पत्रान्वये श्री. रा. स. अटक, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.१८/०७/२००८ चे पत्र सोबत पाठविलेले आहे. अवर सचिव यांनी मा. आ. श्री. प्रकाश शेंडगे, यांनी विधान परिषदेमध्ये विशेष उल्लेखासंबंधीची सूचना म्हणून मा. उपसभापती यांच्या परवानगीने मांडली. त्यांच्या विशेष उल्लेखनीय सूचनेमध्ये त्यांनी असे प्रस्तावित केले की, महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांना त्या त्या भागातील संत महात्म्यांची नांवे देण्यात आली आहेत. सामाजिक क्षेत्रात गौरवास्पद काम केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे सामाजिक आणि धार्मिक व राजकीय कार्य पाहता त्यांचा उचित गौरव करण्यासाठी सोलापूर येथील विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव देण्याबाबत व सदर विषय सार्वजनिक दृष्टीने महत्वाचा असल्याने ते विशेष उल्लेखांद्वारे सभागृहात मांडू इच्छितात असे नमूद केले आहे.)

याबात पुढे असे सादर करण्यात येते की, शासनाने याबाबत विद्यापीठाचा अहवाल मागविलेला आहे.

शासनास अहवाल पाठविण्याचा असल्यामुळे या विषयावर व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेणे अपेक्षित आहे. जो निर्णय होईल तो शासनास तात्काळ कळविण्यात येईल.

सबब वरील विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. ४: ही व्यवस्थापन परिषद सोलापूर विद्यापीठाच्या नावात सद्यस्थितीत बदल करु नये असा ठराव करत आहे.**

**मा.कुलगुरुंच्या परवागीने येणारे आयत्या वेळेचे विषय:-**

**विषय क्र. ४(१): परीक्षा विभागाकडील Convocation Expenses या शिर्षकाचे पुर्ननियोजन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**
**(सोबत पुर्ननियोजनाचा प्रस्ताव जोडला आहे).**

**ठराव क्र. ४(१): परीक्षा विभागाकडील Convocation Expenses या शिर्षकाचे पुर्ननियोजन करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने मा.सचिव यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
एम. एस. शेजूळ
सदस्य सचिव, व्यवस्थापन परिषद

सही/-
बी. पी. बंडगर
अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद